ePaper

## कर्नाटकात मुख्यमंत्री बदलणार? सिद्धरामय्या व शिवकुमार यांच्यात द्वंद्व




वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | बुधवार | दि. 27 मे 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!




पान 2 वरुन...

पुण्यात 400 कोटींची गुंतवणूक!

## पुणे ते शिरूर केवळ ४५ मिनिटांत तर अहिल्यानगर, मराठवाडा प्रवास सुसाट

# देशातील सर्वात मोठा उन्नत महामार्ग

**महाईन्यूज ।**
**पुणे**

**पुणे-शिरूर महामार्गावरील वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी उन्नत महामार्गाच्या उभारणीस गती मिळाली आहे. हा देशातील सर्वांत लांब उन्नत महामार्ग ठरणार असून, त्याची लांबी ३५.१२ किलोमीटर असेल. याचबरोबर पुणे-शिरूर महामार्गाचे रुंदीकरण करून तो सहापदरी केला जाणार आहे. यामुळे पुणे ते शिरूर हा प्रवास केवळ ४५ मिनिटांत होणार असून, अहिल्यानगर आणि छत्रपती संभाजीनगरला जाण्यासाठी लागणारा वेळही कमी होणार आहे.**



पुणे ते शिरूर उन्नत महामार्गाच्या कामास राज्य मंत्रिमंडळाच्या पायाभूत सुविधा समितीने गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये मंजुरी दिली होती. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने हा प्रकल्प राज्य सरकारकडे हस्तांतरित केला होता. त्यानंतर राज्य सरकारने या प्रकल्पाची जबाबदारी महाराष्ट्र पायाभूत सुविधा विकास महामंडळावर सोपविली. या कामाची निविदा वेलस्पन कंपनीला मिळाली असून, आता महामंडळाकडून कंपनीला या प्रकल्पाचा कार्यदेश देण्यात आला आहे. या प्रकल्पाचा एकूण खर्च ७ हजार ३०० कोटी रुपये आहे. हा प्रकल्प बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा, या तत्वावर उभारण्यात येणार आहे. या प्रकल्प चार वर्षांत पूर्ण करण्याची मुदत आहे.

पुणे ते शिरूर महामार्गावरील हा प्रकल्प एकूण ५३.४ किलोमीटर लांबीचा असेल. त्यात ३५.१२ किलोमीटरचा उन्नत सहापदरी मार्ग असेल. याचबरोबर सध्या असलेल्या महामार्ग अद्ययावत करून तो सहापदरी करण्यात येईल आणि त्याची लांबी १८.२ किलोमीटर असेल. हा मार्ग खराडी येथून सुरू होऊन शिरूरमध्ये संपेल. नियोजित रामवाडी ते वाघोली हा मेट्रो मार्ग याच महामार्गावरून जाणार आहे. त्यामुळे तिथे दुमजली उड्डाणपूल उभारण्यात येणार आहे. हा पूल ११.६ किलोमीटरचा असेल. त्यात पहिल्या पातळीवर सहापदरी रस्ता आणि दुसऱ्या पातळीवर मेट्रो मार्गिका असेल, अशी माहिती महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

### प्रकल्पाची वैशिष्टे

एकूण लांबी ५३.४ किलोमीटर
उन्नत मार्ग – ३५.१२ किलोमीटर
सध्याच्या महामार्गाचे रुंदीकरण – १८.२ किलोमीटर
बांधकामाचा कालावधी – ४ वर्षे – एकूण खर्च – ७ हजार ३०० कोटी रुपये

### प्रवासाचा वेळ वाचणार

पुणे ते शिरूरदरम्यान सध्याची वाहतूक कोंडीची स्थिती अतिशय बिकट आहे. यातून मार्ग काढण्याची गरज निर्माण झाली होती. त्यामुळे आता पुणे ते शिरूर हा सहापदरी उन्नत महामार्ग तयार केला जाणार आहे. या प्रकल्पामुळे वाहतूक कोंडी कमी होणार आहे. तसेच, पुण्यातून अहिल्यानगर आणि छत्रपती संभाजीनगर प्रवासाचा वेळ कमी होणार आहे. यामुळे मराठवाड्याशी अधिक वेगवान जोडणी होणार आहे. लवकरच हे काम सुरू होणार असून, हा देशातील सर्वांत मोठा सहापदरी उन्नत महामार्ग ठरेल, असे ब्रिजेश दीक्षित यांनी नमूद केले.

### जागेच्या अभावामुळे उन्नत पर्याय

पुणे ते शिरूरदरम्यान उन्नत मार्ग उभारण्याचा निर्णय जागेच्या अभावी घेण्यात आला आहे. पुणे ते शिरूर हा औद्योगिक पट्टा मोठ्या प्रमाणात विकसित झालेला आहे. या मार्गावर निवासी आणि व्यावसायिक इमारतींची संख्या जास्त आहे. त्यामुळे भूसंपादन करून विस्तारित मार्ग उभारणे अव्यवहार्य होते. त्यातूनच सध्या असलेल्या महामार्गावरच उन्नत मार्ग उभारण्याचा प्रस्ताव समोर आला. सध्या ८० टक्के जागा या प्रकल्पासाठी उपलब्ध आहे. त्यामुळे या प्रकल्पासाठी भूसंपादनाचा प्रश्न निर्माण झाला नाही, असे महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक ब्रिजेश दीक्षित यांनी सांगितले.

# पुण्यात 400 कोटींची गुंतवणूक!

## मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत करार, एक हजारांहून अधिक रोजगारांची निर्मिती

**महाईन्यूज । पुणे**

**राज्य शासन आणि अग्रेको इंडिया कंपनीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आज झालेल्या सामंजस्य करारामुळे पुण्यात पुढील दहा वर्षात सुमारे चारशे कोटी रुपयांची गुंतवणूक आणि सुमारे एक हजारावर थेट रोजगाराची निर्मिती होणार आहे. त्यासाठी या कंपनीला उत्कृष्ट कार्यपरिसर मिळण्याबरोबरच आवश्यक सर्व सहकार्य केले जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.**





> पुणे आता ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर्सचे (जीसीसी) एक महत्वाचे बनत असून या जीसीसी राजधानीत अग्रेको कंपनीचे स्वागत आहे. भारतात विशेषतः महाराष्ट्रात या कंपनीला उत्कृष्ट कार्यपरिसर मिळेल.
>
> **- देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री.**

सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या या सामंजस्य कराराप्रसंगी मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. पी. अन्बळगण, गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, अग्रेको इंडियाचे संचालक सन्नी ठकरार, ग्रुप प्रमुख स्टीफन रेआ, व्यवस्थापकीय संचालक राहुल खरे, हेड ऑफ प्रोक्युअरमेंट अँड ग्लोबल सप्लाय सुनील देशमुख, व्यापार सल्लागार मार्क बिरेल, वरिष्ठ व्यापार सल्लागार प्रतीक्षा क्षीरसागर आदी उपस्थित होते.

पुणे येथील प्रकल्पासाठी शासनाकडून आवश्यक परवानग्या, नोंदणी, मंजुरी, सवलती आणि अन्य प्रशासकीय बाबींमध्ये विद्यमान धोरणांनुसार सहकार्य करण्यात येणार आहे. उद्योग, ऊर्जा, कामगार आणि खनिकर्म विभागांच्या माध्यमातून या गुंतवणुकीला गती देण्यात येणार आहे.

अग्रेको इंडिया ही कंपनी ऊर्जा आणि तापमान नियंत्रण उपाययोजना या क्षेत्रात कार्यरत आहे. आज झालेल्या करारानुसार कंपनीतर्फे पुणे जिल्ह्यातील फुलगाव येथे अत्याधुनिक जागतिक अभियांत्रिकी व उत्पादन केंद्र उभारणार असून त्याचे काम यावर्षी सुरु होणार आहे. हे केंद्र स्कॉटलंडबाहेरील अॅग्रेकोचे सर्वात महत्त्वाचे जागतिक अभियांत्रिकी आणि उत्पादन केंद्र असेल.

या प्रकल्पामुळे स्थानिक पुरवठा साखळीला मोठी चालना मिळणार असून, सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांना जागतिक पुरवठा साखळीशी जोडण्याची संधी उपलब्ध होणार आहे; तसेच अत्याधुनिक उत्पादन, ऊर्जा उपकरण निर्मिती आणि प्रिसिजन इंजिनिअरिंग क्षेत्रात महाराष्ट्राची क्षमता अधिक मजबूत करण्यास हातभार लाभणार आहे.

अग्रेको कंपनीचा कार्यक्षम ऊर्जा आणि शाश्वत तंत्रज्ञानावर आधारित उपाययोजना विकसित करण्यावर भर असणार आहे. विविध क्षेत्रांमध्ये ऊर्जा कार्यक्षमता वाढवणे, कार्बन उत्सर्जन कमी करणे आणि हवामान बदलांविरोधातील प्रतिकारक्षमता मजबूत करण्यासाठी अॅग्रेकोकडून विशेष प्रयत्न करण्यात येणार आहे. त्याचबरोबर राज्याच्या हवामान बदल कृती आराखड्याला पूरक ठरणाऱ्या शाश्वत ऊर्जा आणि तापमान नियंत्रण प्रणालींच्या प्रसारासाठी सहकार्य करण्याचीदेखील ग्वाही कंपनीने दिली आहे.

---

# इंधन दरवाढीच्या विरोधात पुण्याच्या रस्त्यावर आले बैल, घोडा आणि गाढव!

**महाईन्यूज । पुणे**

**केंद्र सरकारने गेल्या काही दिवसांपासून पेट्रोल डिझेल सह गॅस सिलेंडरच्या दरात वाढ करण्याचे धोरण स्वीकारले आहे. इंधनाच्या दरात होत असलेल्या वाढीमुळे सामान्य जनता हवालदिल झाली आहे. केंद्र सरकारच्या या निर्णयाच्या विरोधात काँग्रेस आक्रमक झाली असून सरकारच्या निषेधाच्या आणि धिक्काराच्या घोषणा देत आंदोलने सुरू करण्यात आली आहेत.**








> पेट्रोल, डिझेल बरोबरच घरगुती गॅसची दरवाढ व नागरिकांना घरगुती गॅसचा पुरवठा कमी केला आहे. मोदी सरकारने महिलांच्या हितासाठी मते मागितली परंतु महिलांवरील अत्याचार थांबले नाहीत त्याचबरोबर घरगुती गॅस सिलेंडर च्या कमतरतेमुळे घरगुती आर्थिक गणित कोलमडे असून याला जबाबदार केवळ केंद्रातील मोदी सरकार आहे. महागाईमुळे जीवनावश्यक वस्तू महाग झाल्या असून सर्वसामान्य नागरिकांना घर चालविणे देखील कठिण झाले आहे. उत्पन्न वाढत नाही. परंतु महागाई झपाट्याने वाढत आहे त्यामुळे सर्वसामान्यांचे जगणे मुश्किल झाले आहे.
>
> **- दिप्ती चवधरी, माजी आमदार.**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या सूचनेवरून केंद्र सरकारने केलेल्या पेट्रोल व डिझेल दरवाढीच्या विरोधात पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालय येथे पेट्रोल, डिझेल व घरगुती गॅसची दरवाढ रद्द करावी, यासाठी आंदोलन करण्यात आले. पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय येथे बैलगाडा व टांगागाडी यावर बसून आंदोलन करण्यात आले.

पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप, दिप्ती चवधरी यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयावर हे आंदोलन करण्यात आले. यावेळी केंद्र सरकारचा निषेध करण्यासाठी गाढव देखील आणण्यात आली होती. यावेळी बोलताना जगताप म्हणाले, पश्चिम आशिया युध्दामुळे जागतिक बाजारातील कच्च्या इंधनाचे दर दररोज वाढत आहेत. जागतिक बाजारात इंधनाचे दर कमी असताना पेट्रोल आणि डिझेलवर दररोज एक हजार कोटी रूपयांचा केंद्रीय कर लादूनही भाजप सरकारचे पोट भरलेले नाही. इंधनाचे दर कमी असताना भाजप सरकारने त्याचा लाभ जनतेला मिळवून दिला नाही. जेव्हा पेच प्रसंग उद्भवला तेव्हा भाजपचे नेतृत्व निवडणुकांमध्ये व्यस्त झाले. निवडणुका संपल्यानंतर ते त्यागाचा उपदेश देऊ लागले.

आज चौथ्यांदा इंधन दरवाढ करण्यात आली आहे. इतर देशांच्या तुलनेत भारतातील दर कमी असल्याचे सरकार खोटे सांगत आहे. इंधन दरवाढीमुळे जीवनावश्यक वस्तूंचे भाव वाढले आहेत. त्यामुळे सामान्य जनता त्रस्त झाली आहे. ग्रामीण भागात अनेक ठिकाणी इंधनचा तुटवडा निर्माण झाला आहे, त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीची कामे करण्यासाठी अडथळा येत आहे. भाजपच्या चुकीच्या धोरणांचा भुर्दंड आज सर्वसामान्य नागरिकांना सोसावा लागत आहे. यूपीए सरकारच्या काळात कच्च्या इंधन तेलाचे भाव वाढलेले असताना सुध्दा जनतेचे हित लक्षात घेवून इंधन दरवाढ कमी प्रमाणात करण्यात आली. मोदी सरकारच्या काळात कच्च्या तेलाच्या निष्क्रीय आयात धोरणामुळे देशाला आर्थिक संकटातून जावे लागणार आहे. या कठिण परिस्थितीत सुध्दा केंद्र सरकारने तोडगा काढण्यासाठी सर्व पक्षिय बैठक बोलविली नाही, ही देशासाठी फार मोठी चिंतेची बाब आहे.

दिप्ती चवधरी म्हणाल्या, पेट्रोल, डिझेल बरोबरच घरगुती गॅसची दरवाढ व नागरिकांना घरगुती गॅसचा पुरवठा कमी केला आहे. मोदी सरकारने महिलांच्या हितासाठी मते मागितली परंतु महिलांवरील अत्याचार थांबले नाहीत त्याचबरोबर घरगुती गॅस सिलेंडर च्या कमतरतेमुळे घरगुती आर्थिक गणित कोलमडे असून याला जबाबदार केवळ केंद्रातील मोदी सरकार आहे. महागाईमुळे जीवनावश्यक वस्तू महाग झाल्या असून सर्वसामान्य नागरिकांना घर चालविणे देखील कठिण झाले आहे. उत्पन्न वाढत नाही. परंतु महागाई झपाट्याने वाढत आहे त्यामुळे सर्वसामान्यांचे जगणे मुश्किल झाले आहे.

# कुणाला मिळणार विधान परिषदेवर संधी?

## माजी आमदार विलास लांडे की माजी विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे?

**महाईन्यूज** । पिंपरी-चिंचवड

**पिंपरी-चिंचवडसह पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांचा प्रभाव वाढला आहे. महापालिका निवडणुकीत राष्ट्रवादीला सत्ता पुन्हा स्थापन करता येईल, अशी अपेक्षा असताना आणि दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रचंड प्रयत्न केले असतानाही राष्ट्रवादीला विरोधी बाकावर बसावे लागले. ही निवडणुकत "अजितदादा विरुद्ध महेशदादा" अशी झाली. आता आगामी २०२९ मध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील भाजपाचा प्रभावी चेहरा असलेल्या महेश लांडगे यांना रोखण्यासाठी अर्थात 'डॅमेज' करण्यासाठी पिंपरी-चिंचवडमधून माजी आमदार विलास लांडे किंवा माजी विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे यांना विधान परिषदेवर संधी देण्यात येईल, अशी चर्चा आहे.**

विशेष म्हणजे, विधान परिषदेवर काम करणाऱ्या नेत्याला पुणे, पिंपरी-चिंचवड आणि ग्रामीण भागातील राष्ट्रवादीची विस्कळीत झालेली घडी बसवण्याची जबाबदारी सोपवण्यात येणार आहे. त्यासाठी लांडे आणि काटे समर्थकांनी आपआपल्या परिने लॉबिंग केले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विधान परिषदेच्या १७ जागांसाठी निवडणूक (VIDHAN PARISHAD ELECTION 2026) जाहीर करण्यात आली आहे. विधान परिषदेसाठी दि. १८ जून रोजी मतदान, तर दि. २२ जून रोजी मतमोजणी होणार आहे. निवडणुकीसाठी अर्ज भरण्याची शेवटची तारीख १ जून असून, २ जून रोजी अर्जांची छाननी केली जाईल. तर अर्ज माघारीची मुदत ४ जूनपर्यंत असणार आहे.

राष्ट्रवादीचे विद्यमान शहराध्यक्ष तथा नगरसेवक योगेश बहल यांना पार्टीने शहराध्यक्ष, नगरसेवक, स्थायी समिती सभापती, सत्तारुढ पक्षनेता, महापौर, विरोधी पक्षनेता अशा सर्व पदांवर संधी दिली आहे. प्रदीर्घ अनुभव असतानाही योगेश बहल पक्षाला सत्तेत आणू शकले नाही. किंबहुना, बहल यांच्यामुळे शहर राष्ट्रवादीत "स्थानिक-गाववाला आणि बाहेरगावचा" असा संघर्ष कायम राहीला. त्यामुळे बहल यांना विधान परिषदेवर संधी दिल्यास पक्ष संघटनेचे पाणीपत होईल, असे निरीक्षण राजकीय जाणकार नोंदवतात.

पुण्यातून राष्ट्रवादीचे माजी आमदार सुनील टिंगरे इच्छुक आहेत. मात्र, त्यांचा ग्रामीण भागात आणि पुणे- पिंपरी-चिंचवडमध्ये सर्वदूर प्रभाव नाही. पिंपरी-चिंचवडमधील नगरसेवक संदीप वाघेरे यांचे नाव चर्चेत आहे. मात्र, त्यांच्याकडे अनुभव आणि संघटनात्मक हातोटी दिसत नाही. त्यामुळे नाना काटे आणि विलास लांडे यांच्या नावाला राजकीय वजन प्राप्त झाले आहे.

विधान परिषदेसाठी निवडणूक जाहीर झाल्यानंतर महायुतीकडून जोरदार तयारी सुरु आहे. विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी महायुतीत बैठकांचे सत्र सुरु आहे. याचदरम्यान, एक महत्वाची माहिती समोर आली आहे. विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी महायुतीमध्ये शिवसेनेला ४, तर राष्ट्रवादी काँग्रेसला फक्त एकच जागा मिळणार असल्याची सूत्रांची माहिती आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यात बैठक पार पडण्याची शक्यता आहे. अशात, अंतिम निर्णय तिन्ही नेत्यांकडूनच घेतला जाणार आहे.



### ... म्हणून विठ्ठल उर्फ नाना काटे यांच्या नावाची चर्चा!

दुसरीकडे, दिवंगत अजित पवार यांचे विश्वासू सहकारी म्हणून माजी विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे यांची ओळख आहे. अजितदादांचा दौरा शहरात असेल, तर त्यांच्या गाडीमध्ये हमखास नाना काटे दिसणार, असे चित्र होते. तशी जवळीक आणि विश्वास नाना काटे यांनी खासदार पार्थ पवार यांच्यासोबत कामय ठेवला आहे. पार्थ यांच्या सोबतील नाना काटे सावलीसारखे दिसतात. निष्ठावंताला संधी आणि पिंपरी-चिंचवडमध्ये प्रभावी आणि अनुभवी नेत्याला ताकद म्हणून नाना काटे यांचे नाव विधान परिषदेच्या निवडणुकीत विचाराधीन आहे. राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष योगेश बहल आणि माजी आमदार विलास लांडे असे दोन गट सध्यातरी दिसतात. त्यामुळे या दोन गटांच्या रस्सीखेचमध्ये पक्षाचे राजकीय नुकसान होते. याउलट, नाना काटे यांनी गटा-तटाच्या राजकारणाला कधी थारा दिला नाही. अजित पवार यांच्याशी निष्ठा आणि पार्थ पवारांच्या नेतृत्त्वाला साथ अशी त्यांची राजकीय भूमिका हीच नाना काटेंची जमेची बाजु आहे. संधी कुणाला द्यायची? याचा फैसला आता उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि पार्थ पवार करणार आहेत.

### स्वीकृतनंतर विधान परिषदेत 'मिशन PCMC'

दरम्यान, महापालिका निवडणुकीत पराभव झाल्यानंतर पिंपरी-चिंचवडमध्ये महेश लांडगे यांना आव्हान देण्यासाठी स्वीकृत नगरसेवकपदावर माजी नगरसेविका सीमा सावळे यांची वर्णी लावण्याची भूमिका उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि खासदार पार्थ पवार यांनी घेतली. महापालिका निवडणूक अत्यंत अतितटीची झाली. त्यामध्ये भाजपाने बाजी मारली. भाजपाचा स्थानिक प्रभावी चेहरा म्हणून महेश लांडगे राष्ट्रवादीच्या रडारवर होते. भाजपा आणि महेश लांडगे यांच्या आक्रमक विरोधक असलेल्या सीमा सावळे यांचा या निवडणुकीत पराभव झाला. हा पराभव जिव्हारी लागला आहे. त्यामुळे आता पुन्हा महेश लांडगे यांची 'कोंडी' करण्यासाठी 'मिशन-PCMC' ला हवा देण्यात येत आहे. लांडगे यांची कट्टर विरोधक असलेल्या माजी आमदार विलास लांडे यांना विधान परिषदेवर संधी देण्याबाबत विचाराधीन आहे. राष्ट्रवादीतील जेष्ठांची फळी असो किंवा नवी फळी असो लांडे यांचा सलोखा सर्वांशी आहे. पुणे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत गतवेळी याच जागेवर विलास लांडे यांनी 'क्लेम' केला होता. किंबहुना, उमेदवारी अर्जही अपक्ष दाखल केला होता. मात्र, अजितदादांच्या सूचनेनंतर त्यांनी अखेरच्या क्षणी अर्ज माघारी घेतला आणि अनिल भोसले आमदार झाले. आता लांडे यांनी संधी दिल्यास एक अनुभवी मराठा चेहरा पक्षाला पुणे जिल्ह्यात बळकटी देवू शकतो, ही विलास लांडेंसाठी जमेची बाजू ठरणार आहे.

# संभाजी भेगडे यांची शिवसेना-शिव उद्योग सहकार सेनेच्या शहराध्यक्षपदी निवड!

**महाईन्यूज** । पिंपरी-चिंचवड

**शिवसेना मुख्यनेते आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या आदेशानुसार, पिंपरी-चिंचवड शहरात पक्षाची पाळेमुळे अधिक घट्ट करण्यासाठी एक मोठी राजकीय नियुक्ती करण्यात आली आहे. बाळासाहेब भवन, मुंबई येथे पार पडलेल्या एका विशेष कार्यक्रमात संभाजी हिरामण भेगडे यांची शिवसेना-शिव उद्योग सहकार सेनेच्या पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष पदी अधिकृत घोषणा करण्यात आली.**



वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे व धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या आशीर्वादाने ही निवड झाली असून, या प्रसंगी शिवसेना सचिव संजय मोरे यांच्या हस्ते संभाजी भेगडे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

खासदार श्रीकांत शिंदे, शिवसेना सचिव संजय मोरे, आणि मावळचे लोकप्रिय महासंसदरत्न खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शिवसेना-शिव उद्योग सहकार सेनेचे प्रदेशाध्यक्ष रामेश्वर वाडेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा नियुक्तीपत्र प्रदान सोहळा पार पडला.

> पक्षाने माझ्यावर टाकलेला हा विश्वास मी सार्थ करून दाखवेन. पिंपरी-चिंचवड शहरात पक्ष संघटना मजबूत करणे हेच माझे मुख्य उद्दिष्ट असेल. सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न प्राधान्याने सोडवून, तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचून मुख्यनेते एकनाथजी शिंदे साहेब यांचे हात अधिक बळकट करण्यासाठी मी अहोरात्र काम करेन. पक्षाने दिलेली ही मोठी जबाबदारी मी अत्यंत सक्षमतेने पार पाडीन.
>
> **- संभाजी भेगडे, शहराध्यक्ष, शिवसेना-शिव उद्योग सहकार सेना.**



## भूमिका

**'कॉक्रोच जनता पार्टी' या नावाभोवती निर्माण झालेला वाद हा केवळ सोशल मीडियावरील ट्रेंड किंवा उपरोधिक मोहिमेपुरता मर्यादित नाही. तो आजच्या भारतीय तरुणांच्या मानसिकतेचा, त्यांच्या अस्वस्थतेचा आणि व्यवस्थेविषयी वाढत्या अविश्वासाचा गंभीर सामाजिक दस्तऐवज बनला आहे.**

# झुरळाचे वर्तुळ पूर्ण झाले!




भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी याचिकाकर्त्याला "हे प्रकरण इतक्या भावनिकतेने घेऊ नका" असा दिलेला सल्ला न्यायालयीन दृष्टिकोनातून योग्य असू शकतो; परंतु या संपूर्ण प्रकरणाने समाजातील खोल जखम उघडी केली आहे.

प्रश्न केवळ 'कॉक्रोच' या शब्दाचा नाही, तर त्या शब्दाने व्यक्त झालेल्या मानसिकतेचा आहे. देशातील लाखो तरुण उच्च शिक्षण घेऊनही बेरोजगार आहेत. स्पर्धा परीक्षांतील पेपरफुटी, भरती प्रक्रियेतील भ्रष्टाचार, अपुरी रोजगारनिर्मिती आणि अस्थिर आर्थिक परिस्थिती यामुळे तरुणांमध्ये प्रचंड नैराश्य निर्माण झाले आहे. अशा परिस्थितीत 'कॉक्रोच जनता पार्टी'सारखी उपरोधिक चळवळ उदयास येते, तेव्हा ती केवळ विनोद राहत नाही; ती व्यवस्थेविरोधातील सांकेतिक आंदोलन ठरते.

अभिजीत दीपके यांनी सुरू केलेल्या या ऑनलाइन मोहिमेला अल्पावधीत मिळालेला प्रतिसाद हा तरुणांच्या भावनिक अवस्थेचा संकेत आहे. स्वतःला 'आळशी', 'बेरोजगार' किंवा 'ऑनलाइन सक्रिय' म्हणत तरुणांनी आत्म-व्यंग्याचा मार्ग स्वीकारला. परंतु हे आत्म-व्यंग्य प्रत्यक्षात व्यवस्थेच्या अपयशावरचे भाष्य आहे. जेव्हा एखाद्या पिढीला शिक्षण असूनही सन्मानजनक रोजगार मिळत नाही, तेव्हा ती उपरोधातून स्वतःचा आवाज शोधू लागते.

या प्रकरणाने आणखी एक महत्त्वाचा मुद्दा अधोरेखित केला आहे. सार्वजनिक पदांवरील व्यक्तींच्या भाषेची जबाबदारी. न्यायमूर्ती असोत किंवा राजकीय नेते, त्यांच्या शब्दांना केवळ वैयक्तिक मत म्हणून पाहिले जात नाही. त्यांचा सामाजिक परिणाम होतो. 'झुरळ'सारखी उपमा अनेक तरुणांना अपमानास्पद वाटणे स्वाभाविक आहे. विशेषतः अशा काळात, जेव्हा युवक आधीच असुरक्षितता आणि उपेक्षेच्या भावनेतून जात आहेत.

सोशल मीडिया आजच्या काळातील नवा सार्वजनिक चौक बनला आहे. येथे विनोद, राजकारण, संताप आणि प्रतिकार एकत्र येतात. त्यामुळे प्रत्येक व्यंगात्मक मोहिमेकडे केवळ 'ट्रोलिंग' म्हणून पाहणे धोकादायक ठरू शकते. 'कॉक्रोच जनता पार्टी'मागील संदेश हा व्यवस्थेतील बंद दारांविरोधातील असंतोषाचा आहे. तो बेरोजगारी, सामाजिक असमानता आणि तुटलेल्या आश्वासनांविरोधातील प्रतिक्रिया आहे.

लोकशाही केवळ निवडणुकांनी मजबूत होत नाही; ती नागरिकांच्या सन्मानाने मजबूत होते. तरुणांना केवळ संयमाचा सल्ला देऊन चालणार नाही. त्यांना विश्वास, संधी आणि आशा द्यावी लागेल. कारण आशा संपली की समाजात उपरोध जन्म घेतो, आणि उपरोध जेव्हा व्यापक होतो, तेव्हा तो केवळ विनोद राहत नाही — तो इशारा बनतो.

## प्रासंगिक »

### संगतीचे परिणाम

**एक शेतकरी होता. त्या शेतकऱ्याच्या शेतात कावळ्यांचा एक मोठा थवा रोज यायचा. ते कावळे शेतातील पिकांची नासाडी करायचे. त्यामुळे शेतकऱ्याला खूप त्रास व्हायचा. शेतकऱ्यांने एकदा त्यांना धडा शिकवायचे ठरवले.**

एक दिवशी शेतकऱ्याने शेतात जाळे पसरून ठेवले. त्यावर थोडे धान्य टाकले. कावळ्यांनी धान्य पाहिले व ते धान्य खाण्यासाठी शेतात उतरले अन् जाळ्यात अडकले. सगळे कावळे जाण्यात अडकलेले पाहून शेतकरी खुश झाला. तो म्हणाला, "अरे चोरांनो, आता तुम्हाला चांगली शिक्षा मिळेल." एवढ्यात त्याला एक केविलवाणा आवाज ऐकू आला. त्याला आश्चर्य वाटले.त्याने काळजीपूर्वक पाहिले तर त्या जळ्यामध्ये कावळ्या बरोबर एक कबूतर अडकलेले त्याला दिसले. शेतकरी कबुतराला म्हणाला, "तु कसा काय या टोळीत सामील झालास? पण आता काहीही झाले तरी मी तुला सोडणार नाही. तू वाईट संगत धरलीस त्याचा परिणाम तुला भोगावाच लागेल." असे म्हणून शेतकऱ्यांने आपल्या शिकारी कुत्र्यांना बोलावले. धावत आलेल्या कुत्र्यांनी एकामागून एक सगळ्या पक्षांना ठार मारले.

तात्पर्य - वाईट संगतीत राहू नये.

विधानपरिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांच्या १६ जागांसाठी होणारी निवडणूक महायुतीतील अंतर्गत संघर्ष अधिक तीव्र करणारी ठरत आहे.

# शिवसेनेसाठी अस्तित्वाची लढाई




विशेषतः एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेसाठी ही निवडणूक केवळ जागावाटपाची नाही, तर राजकीय अस्तित्व आणि संघटनात्मक ताकद सिद्ध करण्याची लढाई बनली आहे. भाजपची वाढती ताकद आणि स्थानिक पातळीवरील विस्तार पाहता, महायुतीत 'मोठा भाऊ' म्हणून भाजपची भूमिका अधिक आक्रमक होताना दिसत आहे.

२०१६ मध्ये एकसंध शिवसेनेकडे पाच जागा होत्या. मात्र आता परिस्थिती पूर्णतः बदलली आहे. पक्ष फुटीनंतर शिंदे गटाची ताकद स्वतंत्रपणे किती आहे, याची खरी परीक्षा या निवडणुकीत होणार आहे. ठाणे, नाशिक, जळगाव, रत्नागिरी-रायगड आणि छत्रपती संभाजीनगर या मतदारसंघांवरून भाजप आणि शिवसेनेत थेट संघर्ष उभा राहिला आहे. भाजपने अनेक भागांत स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आपले संख्याबळ वाढवले असल्याने ते अधिक जागांवर दावा करत आहेत. दुसरीकडे शिवसेना आपली पारंपरिक पकड कायम असल्याचा दावा करत सात जागांची मागणी करत आहे.

विशेषतः ठाणे हा एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला मानला जातो. मात्र गेल्या दशकात भाजपने कल्याण, वसई-विरार, पालघर आणि उल्हासनगरमध्ये मजबूत संघटन उभी केली आहे. त्यामुळे भाजपचा दावा केवळ राजकीय नसून संख्याबळावर आधारित आहे. जळगावमध्येही शिवसेनेने दावा केल्याने भाजपचे मंत्री गिरीश महाजन आणि शिवसेनेचे गुलाबराव पाटील यांच्यातील संघर्ष उघडपणे समोर आला आहे. हे चित्र महायुतीतील अस्वस्थतेचे द्योतक आहे.

या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचीही अवस्था काही वेगळी नाही. पुणे आणि रायगड-रत्नागिरीसारख्या जागांवर दावा असला तरी भाजपच्या वाढत्या प्रभावामुळे त्यांची मोलाची राजकीय जागा कमी होताना दिसते. एकेकाळी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निर्णायक प्रभाव असलेले शिवसेना आणि राष्ट्रवादी हे पक्ष विभाजनानंतर कमकुवत झाले आहेत. त्याचा थेट फायदा भाजपला होताना दिसत आहे.

भाजपने १२ जागा लढवण्याची भूमिका घेतल्यास महायुतीतील इतर घटक पक्षांना दुय्यम स्थान स्वीकारावे लागेल. त्यामुळे ही निवडणूक केवळ विधानपरिषदेपुरती मर्यादित राहिलेली नाही, तर महायुतीतील भविष्यातील सत्तासमीकरणांची दिशा ठरवणारी ठरत आहे. शिवसेनेसाठी तर ही निवडणूक स्वतःची राजकीय उपयुक्तता आणि प्रभाव टिकवून ठेवण्याची निर्णायक कसोटी आहे.

## ।। अभंगवाणी ।।



एके घाई खेळतां न पडसी डाई ।
दुचाळ्याने ठकसील भाई रे ।

त्रिगुणांचे फेरी थोर कष्टी होसी ।
या चौघांसी तरी धरीं सोई रे ॥१॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# देशातील पहिला 'पाण्याचा सातबारा' महाराष्ट्रात

## महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंनी स्पष्ट केला 'वॉटर इकॉनॉमी'चा प्लॅन

महाईन्यूज । मुंबई

**पाण्याचा बेसुमार वापर टाळण्यासह जल व्यवस्थापन करण्यासाठी आता जमिनीच्या सातबाराच्या धर्तीवर 'पाण्याचा सातबारा' देशात प्रथम महाराष्ट्रात विकसित करण्याचे नियोजन सुरू आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महसूल, पाणीपुरवठा व स्वच्छता, ग्रामविकास विभागाच्या सचिवांसोबत आज मंत्रालयातील बैठकीत याबाबतचे भक्कम पाऊल टाकण्यात आले.**



जलव्यवस्थापन करणाऱ्या " अक्वेरियम "या संस्थेने यासाठी 'वॉटर ऑडिट' आणि 'बॅलन्सशीट'ची संकल्पना मांडली असून, ही अभिनव योजना राज्यात सुरुवातीला प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेवरून ही बैठक आयोजित करण्यात आल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.

सध्या सर्वत्र जमिनीच्या नोंदीसाठी 'सातबारा' उतारा अस्तित्वात आहे, मात्र पाण्यासाठी अशी कोणतीही नोंद प्रणाली नाही. पाण्याला जागतिक स्तरावर जो मान आणि दर्जा मिळायला हवा, तो सध्या मिळत नाही. एकदा पाण्याचे ऑडीट झाले की, त्याचा वापर कसा करायचा याबाबत काळजी घेतली जाते. जोपर्यंत पाण्याचा वापर रेकॉर्ड केला जात नाही, तोपर्यंत त्यावर नियंत्रण राहणार नाही आणि लोकांची पाण्याचा वापर करण्याबाबतची जबाबदारीही निश्चित होणार नाही. याच उद्देशाने 'ब्लू ग्रीन अर्बन डेव्हलपमेंट'च्या धर्तीवर हे महत्त्वाचे पाऊल उचलण्यात येत आहे.

या महत्त्वपूर्ण प्रकल्पासाठी अक्वेरियमचे प्रमुख डॉ. सुब्रमन्यम कंसूर, जलाभ्यासक डॉ. अविनाश कदम आणि उदय नायर यांनी एकत्रितपणे 'वॉटर अकाऊंटिंग फ्रेमवर्क' आणि 'वॉटर बॅलन्सशीट'ची अद्ययावत संकल्पना विकसित केली आहे. या अंतर्गत पाण्याचे तीन टप्प्यांत ऑडिट केले जाणार असून, त्याचे दरवर्षी वर्गीकरण केले जाईल. या प्रणालीमुळे ग्रामपंचायत किंवा पाणलोट क्षेत्रातील पाण्याचा साठा, आवक, जावक आणि शिल्लक पाणी याचा पारदर्शक ताळेबंद ठेवता येईल.

मंत्रालयातील महसूल विभागात आज झालेल्या बैठकीला पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव पराग जैन, ग्रामविकास विभागाचे सचिव चंद्रकांत पलकुंडवार, जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापडकर यांच्यासह एक्वेरिएम संस्थेचे प्रमुख सुब्रमण्या कुसनूर, आयआयटी बॉंबेचे जल अभ्यासक डॉ. अविनाश कदम, आर्थिक विषयाचे अभ्यासक उदय नायर यावेळी उपस्थित होते.



"या योजनेचा सर्वात मोठा फायदा म्हणजे केवळ पाण्याचे मोजमाप होणार नाही, तर पाण्याचे संवर्धन करणाऱ्यांना 'अक्वाक्रेडिट्स' च्या माध्यमातून प्रोत्साहन दिले जाईल. यामुळे ग्रामीण भागात पाण्याचा वापर अधिक जबाबदारीने आणि पारदर्शकपणे होईल, व भविष्यात एक मोठी 'वॉटर इकॉनॉमी' उभी राहण्यास मदत मिळेल. महाराष्ट्र राज्य हा प्रयोग राबविणारे देशातील पहिले राज्य ठरणार आहे.

– चंद्रशेखर बावनकुळे, महसूलमंत्री.

# सावंतवाडी रेल्वे स्थानकाला 'मधु दंडवते' यांचं नाव; राज्य मंत्रिमंडळाचे मोठे निर्णय!

महाईन्यूज । अलिबाग

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य सरकारची मंत्रिमंडळ बैठक घेण्यात आली. या बैठकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार देखील उपस्थित होत्या. आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत 4 महत्वाचे निर्णय घेण्यात आले.**




सावंतवाडी रेल्वे स्थानकाला लोकनेते मधू दंडवते यांच नाव दिलं जाणार आहे. याबाबत आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत प्रस्ताव ठेवण्यात आला. मधू दंडवते यांचं कोकण रेल्वेसाठी योगदान पाहता त्यांच नाव देण्याची अनेक वर्षांची मागणी होती. अखेर आज मंत्रिमंडळ बैठकीसमोर परिवहन विभागाकडून याबाबतचा प्रस्ताव ठेवण्यात आला. मंत्रिमंडळ बैठकीत या प्रस्तावाला मान्यता मिळाल्यानंतर राज्य सरकार हा प्रस्ताव केंद्र सरकारला पाठवणार आहे.

आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत पेट्रोल आणि डिझेलच्या टंचाईबाबतही चर्चा झाली. काही जिल्ह्यात पेट्रोल आणि डिझेलची अल्प प्रमाणात टंचाई असल्याबाबत बैठकीत चर्चा झाली. यावेळी ऑईल कंपन्यांशी संवाद सुरू असून लवकर पुरवठा साखळीदारांना योग्य त्या सूचना दिल्या जातील, अशी माहिती मंत्री छगन भुजबळ यांनी मंत्रिमंडळाच्या बैठकीत दिली.

## मंत्रिमंडळ बैठकीत सरकारने घेतले महत्वाचे निर्णय

- सावंतवाडी रेल्वे स्थानकाला कोकण रेल्वेचे शिल्पकार ज्येष्ठ नेते स्व. मधु दंडवते यांचे नाव. सावंतवाडी रेल्वे स्थानकाचे नाव 'लोकमान्य मधु दंडवते रेल्वे टर्मिनस' असे करण्यास मंत्रिमंडळाची मंजुरी. कोकणातील जनतेची अनेक वर्षांची मागणी मार्गी. नामकरणाबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात येणार.
- शासकीय कर्मचाऱ्यांच्या २०२६ मधील सर्वसाधारण बदल्यांना मुदतवाढ. त्यासाठी महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे नियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मध्ये सूधारणेस मान्यता.
- डोंबिवलीतील सोनारपाड्यातील पिंपळेश्वर मंदिराला जमीन. डोंबिवली औद्योगिक क्षेत्रातील मौजे सागाव सोनारपाडा (ता. कल्याण, जि. ठाणे) येथील पिंपळेश्वर देवस्थान मंदिर ट्रस्टला ४ एकर २५ गुंठे जमीन मिळणार. या जमिनीवरील मंदिर ट्रस्टचा वापर नियमित करण्यास व ही जमीन ट्रस्टला नाममात्र दरात देण्यास मान्यता.
- नवीन नागपूर व नवीन बाह्य वळण रस्त्यासाठी खरेदी करायच्या जमिनीसाठीचे मुद्रांक शुल्क माफ करण्याचा निर्णय. मौजे गोदणी आणि मौजे लाडगाव (रीठी) (ता. हिंगणा, जि. नागपूर) येथील खाजगी जमीन नवीन नागपूर व नवीन बाह्य वळण रस्ता प्रकल्पासाठी वाटाघाटीने थेट खरेदी करावी लागणार. या व्यवहारावरील मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्क माफ करण्यास मान्यता.

## नागपूरसाठी महत्वाची मंजुरी

नवीन नागपूर व नवीन बाह्य वळण रस्त्यासाठी खरेदी करायच्या जमिनीसाठीचे मुद्रांक शुल्क माफ करण्याचा महत्वाचा निर्णय आजच्या बैठकीत घेण्यात आला. मौजे गोदणी आणि मौजे लाडगाव (रीठी) (ता. हिंगणा, जि. नागपूर) येथील खाजगी जमीन नवीन नागपूर व नवीन बाह्य वळण रस्ता प्रकल्पासाठी वाटाघाटीने थेट खरेदी करावी लागणार आहे. या व्यवहारावरील मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्क माफ करण्यास मान्यता बैठकीत देण्यात आली.

# कर्नाटकात मुख्यमंत्री बदलणार?

## सिद्धरामय्या-शिवकुमार दिल्ली दौऱ्यावर असताना काँग्रेस नेत्याचे वक्तव्य; भाजपावर गंभीर आरोप

**महाईन्यूज । कर्नाटक**

**कर्नाटकातील काँग्रेस सरकारला तीन वर्षे पूर्ण झाली असून, राज्यात पुन्हा एकदा नेतृत्वबदल आणि मंत्रिमंडळ फेरबदलाच्या चर्चांना उधाण आले आहे. मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांनी दिल्लीत काँग्रेसच्या वरिष्ठ नेतृत्वाची भेट घेतली. या बैठकीनंतर राज्याच्या राजकारणात मोठे निर्णय होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पण, या चर्चांवर काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि कर्नाटकचे विधान परिषद सदस्य बी. के. हरिप्रसाद यांनी स्पष्टीकरण दिले आहे.**



नेतृत्वबदल आणि मंत्रिमंडळ फेरबदलाच्या चर्चांबाबत बी. के. हरिप्रसाद यांनी यांनी बोलताना कर्नाटकात नेतृत्वबदलाच्या शक्यतेच्या चर्चा फेटाळून लावल्या. तसेच, हरिप्रसाद यांनी भाजपाच्या ट्रोल आर्मीवर दिशाभूल करणारी माहिती पसरवण्याचा आरोप केला. सिद्धरामय्या यांची पाच वर्षांसाठी निवड करण्यात आल्याचेही हरिप्रसाद यांनी स्पष्ट केले. मुख्यमंत्र्यांच्याविरोधात भ्रष्टाचार किंवा इतर प्रकारचे गंभीर आरोप केल्यानंतरच नेतृत्वबदलाचा विचार केला जाईल, असेही हरिप्रसाद म्हणाले.

"सिद्धरामय्या यांची निवड करण्यात आली तेव्हा पाच वर्षांसाठी त्यांची निवड केली. जेव्हा भ्रष्टाचार किंवा इतर प्रकारचे गंभीर आरोप त्यांच्याविरुद्ध होतील तेव्हा नेतृत्वबदलाचा विचार केला जाईल. भाजपाच्या ट्रोल आर्मीला उत्तर देण्याची गरज नाही", असे हरिप्रसाद यांनी ANI या वृत्तसंस्थेशी बोलताना सांगितले. "भाजपाची ट्रोल फॅक्टरी ही खोटं पसरवणारी फॅक्टरी आहे. कर्नाटकला त्रास देण्यासाठी ते २४ तास काम करत आहेत. भाजपाकडूनच खोटं पसरवलं जात आहे, काँग्रेसमधून कोणी यावर भाष्य केलेले नाही. भाजपा सोशल मीडियातून याचा प्रसार करत आहे", असा आरोप हरिप्रसाद यांनी केला.

"त्यांच्याबरोबर काय होतंय हे त्यांना माहिती नाही, त्यांना एपस्टीन फाईल्समध्ये काय आहे? याबाबत विचारा, मोदींनी ट्रम्प यांच्यापुढे शरणागती पत्कारली याबाबत त्यांना विचारा, या गोष्टींवर चर्चा व्हायला हवी. कर्नाटकमध्ये काँग्रेस मजबूत आहे. अजून दोन वर्षांनी भाजपाला पुन्हा कसे पराभूत करण्याची स्ट्रॅटेजी ठरविण्यासाठी सिद्धरामय्या यांनी दिल्लीत बोलवले आहे", असे हरिप्रसाद एएनआयशी बोलताना म्हणाले.

### अडीच-अडीच वर्षांचा फॉर्म्युला?

दरम्यान, कर्नाटकात २०२३ च्या विधानसभा निवडणुकीनंतर मुख्यमंत्रीपद 'अडीच-अडीच वर्षे' वाटून देण्याचा अनौपचारिक फॉर्म्युला ठरल्याची चर्चा होती. त्यामुळे शिवकुमार समर्थक आता त्यांना मुख्यमंत्रीपदी संधी देण्याची मागणी आक्रमकपणे करत आहेत. मात्र, सिद्धरामय्या यांनी वारंवार "मी पूर्ण पाच वर्षे मुख्यमंत्री राहणार," अशी भूमिका घेतली आहे. त्याचवेळी त्यांनी पक्षश्रेष्ठींचा निर्णय मान्य करण्याची तयारीही दर्शवली आहे.

# अमेरिकेतल्या व्हर्जिनियामध्ये गुजराती महिला मेघनाबेन पटेल यांची हत्या

**महाईन्यूज । अमेरिका**

**अमेरिकेतल्या व्हर्जिनिया या ठिकाणी एक भयंकर घटना घडली. चेहऱ्यावर मास्क घालून आलेल्या एका हल्लेखोराने एका सुपरमार्केटमध्ये शिरून गोळीबार केला. तसंच त्याने केलेल्या गोळीबारात ४५ वर्षीय मेघाबेन पटेल या महिलेचा मृत्यू झाला. या हल्लेखोराने या महिलेची हत्या केली. व्हर्जिनियामध्ये राहणारे भारतीय आणि गुजरातवर या घटनेमुळे शोककळा पसरली आहे.**





मेघनाबेन पटेल ही महिला त्या सुपर मार्केटमध्ये मागील दहा वर्षांपासून काम करत होती. ज्यावेळी सुपर मार्केटवर हल्ला झाला त्यावेळेचं सीसीटीव्ही फुटेजही समोर आलं आहे. त्यात हे दिसून येतं आहे की एका मास्क घातलेल्या व्यक्तीने अंधाधुंद गोळीबार केला आहे. त्यावेळी सुपर मार्केट रिकामं होतं. हा हल्लेखोर येतो, महिलेशी काहीतरी बोलतो आणि काही सेकंदांमध्ये बंदूक काढून गोळीबार सुरु करतो. गोळी लागताच ही महिला म्हणजेच मेघनाबेन खाली कोसळली. त्यानंतर काऊंटरवरुन उडी मारुन हा हल्लेखोर पुढे जातो आणि खाली कोसळलेल्या मेघनाबेनवर लागोपाठ गोळ्या चालवतो. हे सगळं सीसीटीव्ही फुटेजमध्ये कैद झालं आहे. एनडीटीव्हीने हे वृत्त दिलं आहे.

मेघनाबेन पटेल या मागील १० वर्षांपासून व्हर्जिनियाच्या सुपर मार्केटमध्ये काम करत होत्या. त्या मूळच्या गुजरातमधील मेहसाणातील विसापूरमध्ये असलेल्या जंत्राल गावाच्या रहिवासी होत्या. मेघनाबेन पटेल यांनी अज्ञात हल्लेखोराने हत्या केल्यानंतर त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांची पती उपेंद्र पटेल, मुलगी नक्षीबेन पटेल आणि स्मिथ पटेल यांना रडू आवरत नाहीये, तसंच अचानक घडलेल्या या घटनेचा त्यांना मोठा धक्का बसला आहे. त्यांच्या कुटुंबावर हा आघात झाला आहे.

या घटनेनंतर व्हर्जिनियातले पोलीस आता त्या अज्ञात हल्लेखोराचा शोध घेत आहेत. पोलिसांनी घटनास्थळी मिळालेले पुरावे गोळा केले आहेत. लुटीच्या उद्देशानेच या हल्लेखोराने मेघनाबेन पटेल यांच्यावर हल्ला केला असा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे.

### नेमकं काय घडलं?

हल्लेखोर जेव्हा मेघनाबेन यांच्याजवळ गेला तेव्हा त्याने लगेचच त्यांच्यावर गोळीबार केला. मेघनाबेन खाली पडल्या तेव्हा त्याने काउंटर ओलांडला आणि त्यांच्यावर पुन्हा गोळ्या झाडल्या. ज्यात मेघनाबेन पटेल यांचा जागीच मृत्यू झाला. त्यानंतर हा हल्लेखोर कॅश बॉक्स घेऊन पळून गेला. पोलिसांनी यानंतर सुपर मार्केटचा परिसर सील केला आहे. तसंच सीसीटीव्हीच्या आधारे या हल्लेखोराचा शोध घेण्यास सुरुवात केली आहे. मेघनाबेन मागच्या १० वर्षांपासून व्हर्जिनियामध्ये राहात होत्या आणि सुपर मार्केटमध्ये काम करत होत्या.

# रणवीर सिंहवर बॉलिवूडमध्ये बंदी..!



बॉलिवूड अभिनेता रणवीर सिंह गंभीर वादात अडकला असताना त्यानं आज मंगळवारी २६ मे २०२६ रोजी सकाळी कर्नाटकातील मैसूर इथल्या प्रसिद्ध चामुंडेश्वरी मंदिरात जाऊन देवीचं दर्शन घेतलं आणि पूजा केली. गाजलेल्या 'कांतारा' चित्रपटातील 'दैवा' परंपरेची नक्कल केल्याप्रकरणी कर्नाटक उच्च न्यायालयानं दिलेल्या आदेशाचं पालन करण्यासाठी रणवीरनं हे दर्शन घेतलं. या प्रकरणावर पडदा पडला असला तरी, आता 'डॉन ३' चित्रपटातून अचानक माघार घेतल्यामुळे 'फेडरेशन ऑफ वेस्टर्न इंडिया सिने एम्प्लॉईज'नं (FWICE) त्याच्यावर बंदी घातल्याच्या काही तासांतच रणवीरनं चामुंडेश्वरी देवीचं दर्शन घेतल्यानं आता चर्चा सुरू आहे. तर झालं असं होतं की, गेल्या वर्षी गोव्यातील आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात 'कांतारा: चॅप्टर १' चं कौतुक करताना रणवीर सिंहनं व्यासपीठावर 'चावुंडी दैवा' या पवित्र धार्मिक परंपरेची नक्कल केली होती. तसंच बोलताना अनवधानानं त्यानं 'भूत' (Female Ghost) असं संबोधलं होतं. यामुळं कर्नाटकातील लोकांच्या धार्मिक भावना दुखावल्याचा आरोप करत रणवीरविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.

# दिव्यांका-विवेकच्या घरी जुळ्या बाळांचं आगमन



छोट्या पडद्यावरील लोकप्रिय अभिनेत्री दिव्यांका त्रिपाठी आणि अभिनेता विवेक दहिया यांच्या घरी आनंदाची बातमी आली आहे. लग्नाच्या अनेक वर्षांनंतर या लोकप्रिय जोडप्याने जुळ्या मुलांचे स्वागत केले आहे. सोशल मीडियावर ही गोड बातमी शेअर होताच चाहत्यांकडून आणि मनोरंजन विश्वातील कलाकारांकडून शुभेच्छांचा वर्षाव सुरू झाला आहे. दिव्यांका त्रिपाठीला चाहत्यांमध्ये 'ईशी माँ' या नावाने विशेष ओळख मिळाली आहे. वयाच्या ४१व्या वर्षी ती आई बनल्याची बातमी समोर येताच चाहत्यांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला. दिव्यांका आणि विवेक यांनी त्यांच्या अधिकृत सोशल मीडिया अकाउंटवर एक खास पोस्ट शेअर केली. या पोस्टमध्ये दोन लहान बाळांचे फोटो दिसत असून त्यांनी हलक्या निळ्या रंगाचे कपडे घातलेले आहेत. या पोस्टसोबत दिव्यांकाने भावूक कॅप्शन लिहिले. "प्रतीक्षा अखेर संपली... आमचे 'मुलगे' आले आहेत आणि आयुष्य आता आणखी सुंदर वाटत आहे," असे तिने म्हटले. तर विवेक दहियानेही आपल्या पोस्टमध्ये आनंद व्यक्त करत "माझे करण-अर्जुन आले" असे लिहित चाहत्यांकडून प्रेम आणि आशीर्वाद मागितले.

# शकीरा आजही 25 ची वाटते!




अभिनेत्री अमिषा पटेल सध्या दोन कारणांमुळे सोशल मीडियावर चर्चेत आहे. पहिले म्हणजे, तिने पॉप स्टार शकीराचे कौतुक केले आहे आणि दुसरे म्हणजे, तिने नवीन बॉलिवूड स्टार्सवर आपला राग व्यक्त केला आहे. अमिषाने शकीराच्या वयाबद्दल सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे. जी चाहत्यांमध्ये चर्चेचा विषय बनली आहे. प्रसिद्ध गायिका शकीराने फिफा विश्वचषक २०२६ च्या 'दाई दाई' या गाण्याद्वारे जोरदार पुनरागमन केले आहे. या गाण्यात तिला नायजेरियन गायक बर्ना बॉयने साथ दिली आहे. या गाण्याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे, ज्यामध्ये शकीरा पिवळ्या रंगाच्या पोशाखात सुंदर नृत्य करताना दिसत आहे. हा व्हिडिओ तिच्या इंस्टाग्राम स्टोरीवर शेअर करत अमिषा पटेलने लिहिले, "व्वा, शकीरा, तू ४९ वर्षांची असूनही अप्रतिम आहेस. तुझे नृत्य, पोशाख आणि लूक तू २५ वर्षांची असतानापेक्षा अधिक हॉट आणि सुंदर आहे." अशा शब्दांत अमिषाने कौतुक केले आहे. दुसरीकडे, अमिषाने आजच्या नवीन बॉलिवूड स्टार्स आणि त्यांच्या कार्यशैलीवर टीका केली आहे. अमिषाचे म्हणणे आहे की, आजचे बॉलिवूड कलाकार अभिनय आणि मेहनतीपेक्षा देखावा आणि सोशल मीडिया आणि पीआरवर जास्त अवलंबून असतात. हे वर्ष २०२६ आहे, २००० नाही. आजकाल एका चित्रपटासाठी १०० कोटी रुपये कमावणे ही काही मोठी गोष्ट राहिलेली नाही, असे मत तिने मांडले.

# समंथा रुथ प्रभुचा दमदार ॲक्शन अवतार



दाक्षिणात्य अभिनेत्री समंथा रुथ प्रभु हिच्या बहुप्रतीक्षित 'मां इंटी बंगारम' या चित्रपटाचा ट्रेलर अखेर प्रदर्शित झाला आहे. ट्रेलरमध्ये सामंथाचा जबरदस्त ॲक्शन अवतार पाहायला मिळत असून, सोशल मीडियावर चाहत्यांकडून त्याला भरघोस प्रतिसाद मिळत आहे. "क्वीन पुन्हा ॲक्शन मोडमध्ये आली", अशा प्रतिक्रिया चाहत्यांनी दिल्या आहेत. ट्रेलरची सुरुवात एका साध्या आणि पारंपरिक कुटुंबात नवीन सून म्हणून आलेल्या महिलेपासून होते. समंथा सुरुवातीला शांत, समजूतदार आणि कुटुंबातील सगळ्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न करणारी सून म्हणून दिसते. मात्र, पुढे कथेत मोठा ट्विस्ट येतो आणि तिच्या आयुष्यातील गुपित हळूहळू समोर येऊ लागते. कुटुंबावर संकट आल्यावर सामंथा धाडसी आणि ॲक्शन अवतारात दिसते. ट्रेलरमध्ये तिचे फाईट सीन्स, दमदार संवाद आणि स्टायलिश ॲक्शन चाहत्यांचे विशेष लक्ष वेधून घेत आहेत. आतापर्यंत रोमँटिक आणि भावनिक भूमिकांमध्ये दिसलेली सामंथा या चित्रपटात पूर्णपणे वेगळ्या भूमिकेत पाहायला मिळणार आहे. 'मां इंटी बंगारम' हा चित्रपट सुरुवातीला १५ मे रोजी प्रदर्शित होणार होता. मात्र, काही कारणांमुळे त्याची रिलीज डेट पुढे ढकलण्यात आली. आता हा चित्रपट १९ जून २०२६ रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. समंथाने स्वतः तिच्या सोशल मीडिया अकाउंटवर ट्रेलर शेअर करत चाहत्यांना खास संदेश दिला. तिने पोस्टमध्ये "आता ट्रिगर दाबण्याची वेळ आली आहे" असे लिहिले. तिच्या या पोस्टनंतर सोशल मीडियावर ट्रेलरची जोरदार चर्चा सुरू झाली.

# सॅफ चषकमध्ये भारताचे अकरा गोल

## फातोर्डा स्टेडियमवर स्पर्धेला सुरूवात; नेपाळचा भूतानवर विजय

**महाईन्यूज । भोपाळ**

**सॅफ महिला फुटबॉल अजिंक्यपद स्पर्धेच्या पहिल्या दिवशी यजमान भारत आणि नेपाळने प्रतिस्पर्धी संघांवर विजय मिळविले. फातोर्डा येथील नेहरु स्टेडियमवर झालेल्या लढतीत भारताने मालदीवचा 11-0 असा फडशा पाडला तर त्यापूर्वी झालेल्या लढतीत नेपाळने विजयाचे पूर्ण तीन गुण कमावताना भूतानला एकमेव गोलने पराभूत केले. नेपाळचा एकमेव गोल भूतानच्या एडॉन दोर्जी हिच्याकडून सेल्फ गोलने झाला.**



भारताला या विजयाने तीन गुण मिळाले. भारतासाठी अवेका सिंगने चार, प्रियांगका देवी व करिष्मा शिरवईकरने प्रत्येकी दोन तर प्यारी शाशा, संगीता बासफोर व ग्रेस डोगमईने प्रत्येकी एक गोल केला.

सामन्याच्या 11व्या मिनिटाला भारताने आपला पहिला गोल केला आणि आघाडी घेतली. संगीता बासफोरने दिलेल्या पासवर प्रियांगका देवीने मालदीवच्या गोलरक्षकाला भेदले आणि चेंडू जाळीत सारला. त्यानंतर भारताने आक्रमक खेळ करून मालदीवच्या बचावळीवर सतत दबाव कायम ठेवला. अशाच एक प्रयत्नात प्रियांगका देवीने अवेका सिंगच्या पासवर दुसरा गोल केला आणि भारताची आघाडी दोन गोलानी वाढवली.

त्यानंतर 28व्या मिनिटाला प्यारी शाशाने लांब पल्ल्यावरून भारताचा तिसरा तर 34व्या मिनिटाला अवेका सिंगने चौथा गोल केला. 38व्या मिनिटाला ग्रेस डोगमेईने भारताचा पाचवा गोल केला व मध्यंतरापर्यंत आघाडी पाचवर नेली.




# टीम इंडियाची 'कॅप्टन कूल' हरमनप्रीत कौरला 'पद्मश्री' पुरस्कार; राष्ट्रपतींच्या हस्ते सर्वोच्च बहुमान

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**भारतीय महिला क्रिकेट संघाची धडाकेबाज कर्णधार हरमनप्रीत कौर हिच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. क्रिकेट क्षेत्रातील तिच्या अफाट आणि ऐतिहासिक योगदानाबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते सोमवारी हरमनप्रीतला देशाचा चौथा सर्वोच्च नागरी पुरस्कार म्हणजेच 'पद्मश्री' प्रदान करून गौरविण्यात आले.**




भारतीय महिला क्रिकेट संघाची कर्णधार Harmanpreet Kaur हिला मिळालेला 'पद्मश्री' सन्मान हा भारतीय महिला क्रिकेटसाठी अत्यंत अभिमानाचा क्षण मानला जात आहे. आगामी महिला टी-२० वर्ल्डकपच्या पार्श्वभूमीवर मिळालेल्या या सर्वोच्च नागरी सन्मानामुळे हरमनप्रीत आणि संपूर्ण भारतीय संघाचा आत्मविश्वास अधिक उंचावला आहे.

पंजाबमधील मोगा या छोट्याशा शहरातून आलेल्या हरमनप्रीत कौरने आपल्या मेहनत, जिद्द आणि आक्रमक फलंदाजीच्या जोरावर जागतिक क्रिकेटमध्ये वेगळी ओळख निर्माण केली. २००९ मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केल्यानंतर तिने भारतीय संघाला अनेक संस्मरणीय विजय मिळवून दिले. तिच्या नेतृत्वाखाली भारतीय महिला क्रिकेट संघाने जागतिक स्तरावर दमदार कामगिरी करत महिला क्रिकेटकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला.

२०१७ च्या महिला वनडे वर्ल्डकपमधील तिची ऑस्ट्रेलियाविरुद्धची नाबाद १७१ धावांची ऐतिहासिक खेळी आजही क्रिकेट चाहत्यांच्या स्मरणात कायम आहे. त्या सामन्यात हरमनप्रीतने केलेल्या तुफानी फलंदाजीमुळे भारताने अंतिम फेरीत धडक मारली होती. तिची ती खेळी महिला क्रिकेट इतिहासातील सर्वोत्तम खेळींपैकी एक मानली जाते.

हरमनप्रीतची आंतरराष्ट्रीय कारकीर्दही प्रभावी राहिली आहे. तिने कसोटी क्रिकेटमध्ये ७ सामन्यांत २३० धावा, वनडेमध्ये १६४ सामन्यांत ४५४१ धावा, तर टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १९५ सामन्यांत ३९११ धावा केल्या आहेत. तिच्या नेतृत्वगुणांमुळे भारतीय महिला संघाला नवसंजीवनी मिळाली आहे.

भारतीय महिला क्रिकेटला जागतिक स्तरावर नवी ओळख मिळवून देण्यात हरमनप्रीत कौरचा मोठा वाटा मानला जातो. तिच्या आक्रमक खेळशैलीमुळे अनेक युवा महिला क्रिकेटपटूंना प्रेरणा मिळाली आहे. देशभरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, सोशल मीडियावरही चाहत्यांकडून शुभेच्छांचा पाऊस पडत आहे.

क्रिकेट तज्ज्ञांच्या मते, हरमनप्रीत कौरची नेतृत्वशैली भारतीय संघासाठी मोठी ताकद ठरत आहे. दबावाच्या परिस्थितीत शांत राहून संघाला विजय मिळवून देण्याची तिची क्षमता विशेष मानली जाते. आगामी टी-२० वर्ल्डकपमध्ये तिच्याकडून पुन्हा एकदा मोठ्या खेळीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## वनडे वर्ल्डकपच्या विजयाची शिल्पकार

हरमनप्रीत कौरच्याच सक्षम नेतृत्वाखाली भारतीय महिला संघाने मागच्या वर्षी पहिल्यांदाच वनडे वर्ल्डकप जिंकून इतिहास रचला होता. भारतीय संघाने पहिल्यांदाच या जेतेपदाला गवसणी घालत, महिला क्रिकेटही जगात कुठेही मागे नाही हे दाखवून दिले होते. पंजाबच्या मोगा सारख्या एका छोट्याशा शहरातून आलेल्या हरमनप्रीतने आपल्या अफाट कौशल्याच्या जोरावर जागतिक क्रिकेटमध्ये भारताचे नाव सुवर्णअक्षरांनी कोरले आहे. तिच्या जिद्द, मेहनत आणि आक्रमक खेळीमुळे आज लाखो तरुणींना क्रिकेटमध्ये करिअर करण्याची प्रेरणा मिळत आहे. भारतीय महिला क्रिकेटला नवी ओळख आणि जागतिक स्तरावर मानाचे स्थान मिळवून देण्यात हरमनप्रीत कौरचे योगदान अतुलनीय मानले जाते.

स्मार्ट PCMC SMART CITY
epaper.mahaenews.com
महाईन्यूज ™
ePaper
। बुधवार ।
दि. 27 मे 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# उर्से मावळमध्ये 'एल निनो'चा धोका

महाईन्यूज ।
पिंपरी-चिंचवड

**यंदा 'एल निनो'च्या प्रभावामुळे पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. संभाव्य दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी प्रशासनाने जलसंधारणाच्या उपाययोजनांना गती दिली आहे.**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत राबविण्यात येणारी 'जलतारा' योजना भूजल पातळी वाढविण्यासाठी महत्त्वाची ठरणार आहे. या योजनेंतर्गत शेतांमध्ये 5 बाय 6 फूट आकाराचे जलसंचय खड्डे खोदून पावसाचे पाणी जमिनीत मुरवले जाते. त्यामुळे भूजलसाठ्याचे पुनर्भरण होण्यास मदत मिळते.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा अधिकाधिक शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. ग्रामसभेत लेबर बजेट मंजूर झाल्यानंतर तालुकास्तरावरून योजनेस मान्यता दिली जाते. त्यानंतर तातडीने प्रत्यक्ष कामाला सुरवात करता येते. 'एल निनो' या हवामान बदलाच्या परिणामामुळे महाराष्ट्रासह देशातील अनेक भागांत तसेच मावळ तालुक्यात सुद्धा सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. त्यामुळे खरीप हंगामावर परिणाम होण्याची भीती निर्माण झाली असून, पाणीसाठा वाढविण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे.


या योजनेचा लाभ घेण्यासाठी ग्रामपंचायतीकडे अर्ज सादर करणे, 7/12 उतारा जोडणे, रोजगार हमी योजनेचे जॉब कार्ड आवश्यक आहे तसेच कृषी सहायक किंवा ग्रामसेवकांकडून जागेची पाहणी केली जाते. योजनेंतर्गत खड्डा खोदकामासाठी शेतकऱ्यांना 5 हजार रुपयांपर्यंत अनुदान दिले जाते.

### भूजलपातळी वाढविण्याचा उद्देश

प्रशासनाने जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य दिले आहे. गावोगावी नाले खोलीकरण, शेततळे, बंधारे दुरुस्ती आणि जलसाठा वाढविण्याच्या उपाययोजना राबवण्यात येत आहेत. पावसाचा प्रत्येक थेंब अडवून भूजलपातळी वाढविण्यावर भर देण्यात येत असून, नागरिकांनाही पाणी बचतीचे आवाहन करण्यात आले आहे. जलसंधारणाच्या या उपाययोजनांमुळे शेती आणि पिण्याच्या पाण्याची टंचाई कमी करण्यास मदत होणार असल्याचा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.



D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY AKURDI PUNE
Think | Thrive | Transform
ADMISSION OPEN
A.Y. 2026




DYPIU is a trendsetting international university focused on preparing students for the future by offering innovative curriculum and unique features that foster creativity, entrepreneurship, & leadership.
It empowers students to be job creators rather than job seekers in the rapidly evolving technology landscape.

UG/PG Programs
- B.Tech. – Bioengineering
- B.Tech. – Chemical Engineering
- B.Tech. – Civil Engineering
- B.Tech. – Mechanical Engineering
- B.Tech. – Semiconductor Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering in Artificial Intelligence & Machine Learning in association with IBM
- B.Tech. – Computer Science and Engineering in Cyber Security and Forensic in association with IBM
- B.Sc. (Hons.) – Economics
- B.Sc. (Hons.) – Forensic Sciences
- BCA (Hons.)
- BBA (Hons.)
- BA (Hons.) – Journalism & Mass Communication
- BA (Hons.) – Liberal Arts
- BFA
- B.Design
- M.Sc. – Medical Biotechnology
- M.Sc. – Medicinal Chemistry
- M.Sc.– Computational Mathematics
- M.Tech. – Computer Science and Engineering in Quantum Computing.
- MCA
- MA – Journalism & Mass Communication
- MBA – Digital Business
- MBA – Executive
- Ph.D.

Follow us on
WhatsApp



CONTACT
Phone Number: 8600091180
Website: dypiu.ac.in
Email: admission@dypiu.ac.in
APPLY NOW
D. Y. Patil International University, J Block, Sector 29, Akurdi, Pune 411044

# स्वागतम ई-प्रवेश प्रणालीला नागरिकांचा प्रतिसाद

## १ मे २०२६ पासून महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत प्रवेशासाठी प्रणाली सुरू

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने नागरिकांना अधिक सुलभ, पारदर्शक आणि वेळेची बचत करणारी सेवा देण्यासाठी दि. १ मे २०२६ पासून महानगरपालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीत प्रवेशासाठी 'स्वागतम ई-प्रवेश' ही ऑनलाइन नोंदणी प्रणाली सुरू केली आहे. या प्रणालीला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत असून १ मे २०२६ ते २५ मे २०२६ (सायंकाळी ४ वाजेपर्यंत) या कालावधीत सुमारे ७ हजार ८९४ नागरिकांनी या प्रणालीचा लाभ घेतला आहे.**



स्वागतम ई-प्रवेश प्रणालीअंतर्गत नागरिकांना महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळ www.pcmcindia.gov.in वर जाऊन 'मुख्य इमारत प्रवेश प्रणाली' या लिंकद्वारे आपली नोंदणी करणे सहज शक्य होत आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे नागरिकांना कमीत कमी वेळेत, सुरक्षित आणि सुलभ पद्धतीने महापालिका मुख्य प्रशासकीय इमारतीत प्रवेश मिळवून देणे तसेच प्रत्येक प्रवेशाची अचूक नोंद महापालिकेकडे ठेवणे हा आहे. ऑनलाइन नोंदणीसाठी आधार क्रमांक, मोबाईल क्रमांक आणि पासपोर्ट आकाराचा फोटो आवश्यक असून नागरिकांनी या नव्या डिजिटल सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

नोंदणीदरम्यान नागरिकांच्या मोबाईल क्रमांकाची ओटीपीद्वारे पडताळणी केली जाणार असून प्रत्येक प्रवेशाच्या वेळीही ओटीपी प्रणाली लागू करण्यात आलेली आहे. प्रवेश नोंदणी करताना नागरिकांनी किमान १ आणि कमाल ३ विभागांना भेट देण्याची माहिती नमूद करणे आवश्यक आहे.

नागरिकांना नोंदणी करताना ते ज्या दिवशी नोंदणी करीत आहेत, त्या दिवसापासून पुढील ७ दिवसांपर्यंत (शनिवार, रविवार आणि शासकीय सुट्ट्या वगळता) उपलब्ध तारखा दिसतील. त्यानुसार इच्छित दिनांक व संबंधित विभाग निवडून नोंदणी करता येईल. नोंदणी पूर्ण झाल्यानंतर नागरिकांना त्यांच्या मोबाईलवर क्युआर कोड डाउनलोड करता येईल. हा क्युआर कोड महापालिका मुख्य इमारतीच्या प्रवेशद्वारावर दाखविल्यानंतर तो स्कॅन करून प्रवेश सुनिश्चित होणार आहे. जर नोंदणीच्या वेळी क्युआर कोड डाउनलोड केला गेला नसला, तरी नागरिक त्यांच्या लॉगिन अकाऊंटवरून तो कधीही डाउनलोड करू शकतात. तसेच आगाऊ तारखेसाठी नोंदणी केल्यास क्युआर कोड डाउनलोड करण्याची सुविधा संबंधित प्रवेशाच्या दिवशी उपलब्ध होईल.

### अशी करा नोंदणी

प्रथमच नोंदणी करणाऱ्या नागरिकांनी आपले लॉगिन अकाऊंट तयार करणे आवश्यक असून त्यामध्ये पूर्ण नाव, राहण्याचा पत्ता, पासपोर्ट आकाराचा फोटो, मोबाईल क्रमांक आणि आधार क्रमांक यांची माहिती नोंदवावी लागेल. लॉगिन अकाऊंट तयार करण्याची प्रक्रिया केवळ एकदाच करावी लागेल. त्यानंतर नागरिकांना प्रत्येक वेळी थेट लॉगिन करून प्रवेशासाठी नोंदणी करता येणार आहे.

> पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरिककेंद्री आणि तंत्रज्ञानाधारित प्रशासनाच्या दिशेने सातत्याने वाटचाल करत आहे. 'स्वागतम ई-प्रवेश' प्रणालीमुळे नागरिकांना महापालिका मुख्य प्रशासकीय इमारतीत प्रवेशासाठी पूर्वनोंदणीची सुलभ सुविधा उपलब्ध झाली असून वेळेची बचत, पारदर्शकता आणि सुरक्षितता सुनिश्चित होत आहे. नागरिकांकडून या उपक्रमाला मिळत असलेला सकारात्मक प्रतिसाद समाधानकारक असून अधिकाधिक नागरिकांनी या डिजिटल सुविधेचा लाभ घ्यावा.
>
> - डॉ.विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

# पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा २३० कोटींहून अधिक मालमत्ता कर वसूल

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने चालू आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये १ एप्रिल २०२६ ते २६ मे २०२६ या कालावधीत २३० कोटींहून अधिक मालमत्ता कर वसूल केला आहे. आतापर्यंत शहरातील २ लाख ३२ हजार ३८५ मिळकतधारकांनी मालमत्ता कराचा भरणा केला असून, उर्वरित मालमत्ताधारकांनी लवकरात लवकर मालमत्ता कर भरावा, असे आवाहन उपायुक्त सचिन पवार यांनी केले आहे.**




पिंपरी चिंचवड महापालिकेकडून ३० जून २०२६ पूर्वी मालमत्ता कर भरणाऱ्या नागरिकांसाठी विविध सवलती लागू करण्यात आल्या असून, त्याला शहरवासीयांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. आतापर्यंत २ लाख ८ हजार ५७० नागरिकांनी ऑनलाइन पद्धतीने मालमत्ता कर भरून १० टक्के सवलतीचा लाभ घेतला आहे. या नागरिकांकडून २१२ कोटी रुपयांहून अधिक मालमत्ता कराचा भरणा डिजिटल माध्यमातून करण्यात आला आहे. डिजिटल माध्यमातून कर भरण्याचे प्रमाण वाढत आहे.

पिंपरी चिंचवड शहरामध्ये निवासी, व्यावसायिक, औद्योगिक, मिश्र वापराच्या तसेच मोकळ्या जागांसह एकूण ७ लाख ४४ हजार ६३० नोंदणीकृत मालमत्ता आहेत. या सर्व मालमत्ताधारकांना चालू आर्थिक वर्षाचे कर देयक वेळेत उपलब्ध करून देण्यात येत आहे.

महापालिकेकडून महिलांच्या नावावरील मालमत्ता, दिव्यांग नागरिक,पर्यावरणपूरक निवासी गृहनिर्माण संस्थांसाठी विविध सवलती देण्यात येत आहेत. विशेषतः ऑनलाइन कर भरण्यास प्रोत्साहन देण्यासाठी १० टक्क्यांपर्यंत सवलत देण्यात येत असल्याने मोठ्या प्रमाणात नागरिक डिजिटल पद्धतीचा वापर करत आहेत. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी महापालिकेच्या कार्यालयात प्रत्यक्ष गर्दी टाळून घरबसल्या ऑनलाइन माध्यमातून मालमत्ता कर भरावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

> पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांनी मालमत्ता कर वेळेत भरून महापालिकेच्या विकासकामांमध्ये सक्रिय सहभाग नोंदविला आहे, ही समाधानाची बाब आहे. ऑनलाइन कर भरणा आणि विविध सवलतींना मिळणारा प्रतिसाद नागरिकांचा प्रशासनावरील विश्वास दर्शवितो. शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य सुविधा आणि इतर नागरी सेवांच्या बळकटीसाठी मालमत्ता कर हा महत्त्वाचा आर्थिक स्रोत आहे. ज्या नागरिकांनी अद्याप कर भरलेला नाही, त्यांनी ३० जूनपूर्वी कर भरून सवलतींचा लाभ घ्यावा तसेच पुढील कारवाई टाळावी.
>
> - डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

> आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये आतापर्यंत २३० कोटींहून अधिक मालमत्ता कर संकलित झाला असून, दोन लाखांहून अधिक मिळकतधारकांनी कर भरला आहे. विशेष म्हणजे, मोठ्या संख्येने नागरिकांनी ऑनलाइन माध्यमातून कर भरण्यास प्राधान्य दिले असून, त्यातून १० टक्के सवलतीचाही लाभ घेतला आहे. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी महापालिकेत प्रत्यक्ष येण्याऐवजी सुरक्षित आणि सुलभ ऑनलाइन माध्यमातून मालमत्ता कर भरून वेळ, श्रम आणि गर्दी टाळावी. उर्वरित मालमत्ताधारकांपर्यंतही लवकरच देयके पोहोचविली जातील.
>
> - सचिन पवार, उपायुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

# नाल्यांवरील अतिक्रमणे तात्काळ हटवा!

## शहर विद्रुपीकरण करणाऱ्या जाहिरातदारांवर कारवाई करा : आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांचे निर्देश

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**संभाव्य पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर नालेसफाईचे काम युद्धपातळीवर पुर्ण करून नाल्यांवरील अतिक्रमणे तात्काळ हटवा. तसेच नाल्यांचा प्रवाह सुरळीत ठेवण्याबाबत दक्षता घ्या, असे निर्देश आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिले. याशिवाय, अनधिकृतपणे जाहिरात फलक किंवा विविध ठिकाणी पत्रके चिकटवून शहर विद्रुपीकरण करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश देखील डॉ. सूर्यवंशी यांनी यावेळी दिले.**



पिंपरी चिंचवड महानगरपालिकाच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनात आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी विविध विभागांच्या कामकाजाचा आढावा घेत शहर स्वच्छता, नालेसफाई, सुशोभीकरण आणि जलतरण तलाव व्यवस्थापनाबाबत महत्त्वपूर्ण निर्देश दिले. बैठकीला अतिरिक्त आयुक्त, सह आयुक्त, मुख्य अभियंते, उप आयुक्त आणि क्षेत्रीय अधिकारी उपस्थित होते.

आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी शहरातील रस्ते दुभाजक, चौक आणि सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ व आकर्षक ठेवण्याच्या सूचना दिल्या. दुभाजकांमध्ये सुशोभित झाडे लावून त्यांची नियमित छाटणी करावी, तसेच बसथांबे, भिंती, उद्याने, शाळा आणि सार्वजनिक ठिकाणी अनधिकृत पोस्टर, स्टिकर्स व जाहिरात फलक लावून शहराचे विद्रुपीकरण करणाऱ्यांवर दंडात्मक आणि फौजदारी कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर मुख्य रस्ते आणि पुलांवर पाणी तुंबू नये यासाठी नालेसफाई युद्धपातळीवर पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. नाल्यांवरील अतिक्रमण हटवून नैसर्गिक प्रवाह कायम ठेवण्यावर भर देण्यात आला. शहरातील १४१ नाल्यांपैकी ९४ हजार ९१३ मीटर लांबीच्या नाल्यांची ८५.८४ टक्के सफाई पूर्ण झाली असून उर्वरित काम वेगाने सुरू असल्याची माहिती देण्यात आली.

तसेच सार्वजनिक स्वच्छतागृहांची नियमित साफसफाई, मोडकळीस आलेल्या स्वच्छतागृहांची दुरुस्ती आणि महापालिकेच्या जलतरण तलावांमध्ये सुरक्षेच्या नियमांचे काटेकोर पालन करण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या.

> पावसाळ्यात नागरिकांना साचलेल्या पाण्याचा त्रास होऊ नये, यासाठी नालेसफाईच्या कामांना सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. मेट्रो आणि रस्ते कामांमुळे काही तांत्रिक अडचणी असल्या तरी सर्व संबंधित विभागांच्या समन्वयातून ३१ मेपर्यंत काम पूर्ण करण्यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि शहरातील पावसाच्या पाण्याचा निचरा सुरळीत राहण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येत आहेत.
>
> - डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

### ३१ मेपर्यंत नालेसफाई पूर्ण करण्याचे उद्दिष्ट

आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील नालेसफाईची कामे वेगाने सुरू असून, विविध अडचणींवर मात करत ३१ मेपर्यंत नालेसफाई पूर्ण करण्याचे उद्दिष्ट पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने निश्चित करण्यात आले आहे. पिंपरी चिंचवड शहरातील अनेक ठिकाणी सुरू असलेल्या मेट्रो प्रकल्पाच्या कामांमुळे तसेच रस्ते विकासाच्या कामांमुळे काही नाल्यांपर्यंत पोहोचण्यात अडथळे निर्माण होत आहेत. याशिवाय, खोल आणि अवघड भागातील नालेसफाईसाठी उपयुक्त ठरणाऱ्या स्पायडर मशीनची अनुपलब्धता हीदेखील मोठी अडचण ठरत आहे. मात्र, या सर्व अडचणी असूनही पालिकेने पर्यायी नियोजन करत नालेसफाईची मोहीम अखंड सुरू ठेवली आहे.

# सांगवीतील रक्षक चौक येथील वाहतूक पर्यायी मार्गाने उपलब्ध

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**सांगवी फाटा ते किवळे रस्त्यावरील रक्षक चौक येथे उभारण्यात आलेल्या भुयारी मार्गाचे काम पुर्णत्वाकडे आले आहे. सध्या पर्यायी मार्गाने वाहतूक उपलब्ध असून या प्रकल्पाचे सर्व सुरक्षा निकष पूर्ण करण्यात आले आहेत. या प्रकल्पासाठी नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्थेच्या माध्यमातून सुरक्षा तपासणी करण्यात आली आहे. तसेच वाहतूक सुरक्षिततेचा सर्वकष आढावा घेण्यासाठी वाहतूक मंत्रालय तसेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे नोंदणीकृत असलेल्या मान्यताप्राप्त सुरक्षा लेखापरीक्षण सल्लागार संस्थेची नियुक्ती करण्यात आलेली होती.**



याशिवाय, सल्लागार संस्थेकडून कामाच्या ठिकाणाची प्रत्यक्ष पाहणी, सर्वेक्षण आणि सखोल अभ्यास करण्यात आला आहे. त्यांच्या अहवालानुसार भुयारी मार्ग आणि त्यास जोडलेल्या रॅम्पच्या सुरक्षिततेसाठी विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत. तसेच भुयारी मार्ग आणि त्याच्या दोन्ही बाजूंच्या उतार रस्त्यांवर वाहनांना एकमेकांना ओलांडण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच इंडियन रोड काँग्रेस (आय.आर.सी) च्या मानकांनुसार सुरक्षित वेगमर्यादा दर्शविणारे ताशी ३० किलोमीटर वेगमर्यादेचे अनिवार्य फलक योग्य ठिकाणी बसविण्यात आले आहेत.

भुयारी मार्ग व त्याच्या दोन्ही बाजूंच्या रॅम्पवर संथ गतीने चालणारी वाहने, सायकलस्वार आणि पादचारी यांना प्रवेश प्रतिबंधित करण्यात आला असून त्यांच्यासाठी स्वतंत्र समतल सेवा रस्त्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे सदर मार्ग हा केवळ मोटार वाहनांच्या वाहतुकीसाठी राखीव ठेवण्यात आला आहे. तसेच बस जलद वाहतूक व्यवस्थेसाठी ताशी ३० किलोमीटर सुरक्षित वेगमर्यादेसह स्वतंत्र मार्गिका निश्चित करण्यात आली आहे.

उताराच्या रस्त्यांवर वेग नियंत्रणासाठी आवश्यक त्या सर्व ठिकाणी भारतीय मानांकनानुसार आडव्या पट्ट्यांचे चिन्हांकन करण्यात आले आहे. तसेच वाहनचालकांना सतर्क करण्यासाठी मार्ग एकत्र येणाऱ्या आणि विभाजित होणाऱ्या ठिकाणी तसेच धोकादायक ठिकाणी सौरऊर्जेवर चालणारे पिवळे दिवे बसविण्यात आले आहेत. या उपाययोजनांमुळे वाहनचालकांना वेग कमी करण्याचा इशारा मिळून अपघाताचा धोका कमी होण्यास मदत होणार आहे.

रात्रीच्या वेळी दृश्यमानता वाढविण्यासाठी संरक्षक कठड्यांवर मध्यदर्शक बसविण्यात आले आहेत. या मध्यदर्शकांवर भारतीय मानांकनानुसार पिवळ्या रंगाची प्रकाश परावर्तित करणारी पट्टी बसविण्यात आली आहे. याशिवाय संपूर्ण पुलावर ताशी ३० किलोमीटर वेगमर्यादा दर्शविणारे वाहतूक नियंत्रण फलक लावण्यात आले आहेत, अशी माहिती स्थापत्य प्रकल्प विभागाकडून देण्यात आली आहे.

> सांगवी-किवळे रस्त्यावरील रक्षक चौक येथे उभारण्यात आलेल्या भुयारी मार्गाचे काम पुर्णत्वाकडे आले असून सध्या पर्यायी मार्गाने वाहतूक सुरू आहे. वाहतूक कोंडी कमी होऊन अडथळाविरहीत प्रवासासाठी हा भुयारी मार्ग सोयीचा ठरणार आहे. नागरिकांनी वेगमर्यादा आणि वाहतुकीचे नियम पाळणे बंधनकारक आहे. तसेच बीआरटीएस मार्गिकांमध्ये खासगी चारचाकी, दुचाकी वाहनांनी प्रवेश करू नये व वाहतुकीच्या नियमांचे पालन करावे.
>
> - कुलदीप जंगम, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

> सांगवी-किवळे रस्त्यावरील रक्षक चौक येथे बांधण्यात आलेल्या भुयारी मार्गाच्या दोन्ही रॅम्पसंदर्भातील सुरक्षा तपासणीतील सर्व बाबी पूर्ण करण्यात आल्या आहेत. नागरिकांनी या मार्गावर ताशी ३० किलोमीटर वेगमर्यादेचे पालन करावे तसेच वाहतुकीचे नियम काटेकोरपणे पाळावेत.
>
> - प्रमोद ओंभासे, मुख्य अभियंता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

# 'विकासाभिमुख हिंदुत्व' जपण्याचा संकल्प !

## भाजपा नेते आमदार महेश लांडगे यांची भावना; स्वातंत्र्यवीर सावरकर पुरस्काराने कार्याचा सन्मान

**महाईन्यूज I पिंपरी- चिंचवड**

**स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या नावाने दिला जाणारा पुरस्कार स्वीकारताना आमदार लांडगे यांनी हा सन्मान आपल्यासाठी अत्यंत गौरवाचा असल्याचे सांगितले. "ज्या महापुरुषांच्या विचारांनी देशाला दिशा दिली, अशा स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या नावाने मिळणारा पुरस्कार हा माझ्यासाठी सर्वोच्च बहुमान आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांना अभिप्रेत 'विकासाभिमुख हिंदुत्व' जपण्याचा संकल्प आम्ही केला आहे, अशा भावना भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केल्या आहेत.**




प्रखर राष्ट्रभक्ती, हिंदुत्वनिष्ठ विचार आणि राष्ट्रनिर्माणासाठी अविरत कार्य करणाऱ्यांना ब्राह्मण जागृती सेवा संघाच्या वतीने प्रदान करण्यात येणारा स्वातंत्र्यवीर सावरकर पुरस्कार भाजपा नेते, आमदार महेश लांडगे यांना नुकताच प्रदान करण्यात आला.

ब्राह्मण जागृती सेवा संघाच्या वतीने आयोजित या विशेष कार्यक्रमात आमदार लांडगे यांनी पुरस्कार स्वीकारताना स्वातंत्र्यवीर सावरकरांना अभिप्रेत असणाऱ्या 'विकासाभिमुख हिंदुत्वाचा' विचार जपण्याचा संकल्प व निर्धार व्यक्त केला. लोकप्रतिनिधी म्हणून काम करत असताना देव देश अन धर्मरक्षणासोबतच विकासात्मक दृष्टिकोनातून आम्ही सदैव कार्यरत आहोत असेही त्यांनी सांगितले. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या नावाने पुरस्कार मिळावा, अशी अनेक कार्यकर्त्यांची भावना असते. मात्र, आपल्या सारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्याला हा बहुमान मिळणे हे आपण आपले भाग्य समजतो, असे सांगत आमदार लांडगे यांनी ब्राह्मण जागृती सेवा संघाच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे मनापासून आभार मानले आणि आपण त्यांचे आजन्म ऋणी असल्याची भावना व्यक्त केली.

या कार्यक्रमाला ज्येष्ठ विचारवंत अविनाश धर्माधिकारी यांची प्रमुख उपस्थित लाभली त्यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच ब्राम्हण जागृती सेवा संघांचे अध्यक्ष राजन लोणकर, संस्थापक अंकित काणे, रोहन जोशी आणि संघटनेचे पदाधिकारी, तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.



❝ स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या नावाने दिला जाणारा हा पुरस्कार स्वीकारताना स्वातंत्र्यवीर सावरकर यांना अभिप्रेत असलेले विकासाभिमुख हिंदुत्व जपण्याची जबाबदारी आणखी वाढल्याची जाणीव झाली आहे. देव, देश, धर्म आणि संस्कृतीच्या प्रचार-प्रसाराचे कार्य अधिक जोमाने सुरू ठेवण्याचा संकल्प आम्ही पुन्हा एकदा केला आहे. भविष्यातही विकास आणि हिंदुत्व यांचा समन्वय साधत काम करत राहणार आहोत.

**- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी चिंचवड, पुणे.**

### सावरकरांच्या विचारांनीच स्वातंत्र्य चळवळ अधिक बळकट

आपल्या भाषणाच्या सुरुवातीला आमदार महेश लांडगे यांनी प्रखर राष्ट्रभक्त, महान क्रांतिकारक स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना भावपूर्ण अभिवादन केले. ते म्हणाले की, स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणांची आहुती दिली. देव, देश आणि धर्मासाठी आपल्या संस्कृतीचे रक्षण व संवर्धन करण्यासाठी त्यांनी संपूर्ण आयुष्य वाहिले. त्यांच्या विचारांनीच स्वातंत्र्य चळवळ अधिक बळकट झाली आणि अखंड भारताची संकल्पना राष्ट्रप्रेमी भारतीयांच्या मनात रुजली.

# पिंपळे सौदागर येथील योगा पार्कच्या कामांना गती; नगरसेवक शत्रुघ्न काटे यांची पाहणी

**महाईन्यूज I पिंपरी- चिंचवड**

**पिंपळे सौदागर येथील बहुप्रतीक्षित 'योगा पार्क'च्या कामांना आता गती मिळण्याची चिन्हे दिसत आहेत. भाजपा शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी सहकारी नगरसेविकांसह पार्कची प्रत्यक्ष पाहणी करत प्रलंबित कामांचा सविस्तर आढावा घेतला.**





या पाहणीवेळी नगरसेविका अनिताताई काटे आणि नगरसेविका कुंदा भिसे उपस्थित होत्या. नागरिकांच्या आरोग्य आणि विरंगुळ्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या या योगा पार्कचे काम अद्याप काही तांत्रिक व सुशोभीकरणाच्या टप्प्यात अडकले आहे. पाहणीदरम्यान मेन्टेनन्स, लॉन दुरुस्ती, पेंटिंग, विद्युत व्यवस्था तसेच क्रीडा विभागाशी संबंधित उर्वरित कामांचा आढावा घेण्यात आला. सर्व कामे युद्धपातळीवर पूर्ण करून पार्क लवकरात लवकर नागरिकांसाठी खुले करण्याच्या स्पष्ट सूचना प्रशासनाला देण्यात आल्या.

शत्रुघ्न काटे यांनी प्रशासनाला निर्देश देताना सांगितले की, "नागरिकांची दीर्घकाळ प्रतीक्षा लक्षात घेता सर्व विभागांनी समन्वय ठेवून कामे तातडीने पूर्ण करावीत. गुणवत्तेवर कोणतीही तडजोड न करता पार्क पूर्णपणे सज्ज करूनच ते नागरिकांच्या सेवेत दाखल करावे." या पाहणीनंतर प्रशासकीय यंत्रणेत हालचाली वाढल्या असून प्रलंबित कामांना गती मिळाल्याचे चित्र दिसत आहे. लवकरच हे योगा पार्क नागरिकांसाठी खुले होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

या योगा पार्कमुळे परिसरातील नागरिकांना सकाळ-संध्याकाळ व्यायाम, योगसाधना आणि चालण्यासाठी एक उत्तम सुविधा उपलब्ध होणार आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला आणि तरुणांसाठी हे ठिकाण आरोग्यदायी जीवनशैलीस प्रोत्साहन देणारे ठरणार आहे. पार्कमध्ये हिरवळ, आकर्षक प्रकाशयोजना आणि आधुनिक सुविधा उभारण्यात येत असल्याने परिसराच्या सौंदर्यातही भर पडणार आहे. नागरिकांनीही पार्कचे काम लवकर पूर्ण करून ते तातडीने खुले करण्याची मागणी केली आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या प्रकल्पाला आता गती मिळाल्याने स्थानिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे. प्रशासनाने दिलेल्या सूचनांनुसार उर्वरित कामे निश्चित मुदतीत पूर्ण करण्यासाठी संबंधित विभागांकडून हालचाली सुरू करण्यात आल्या आहेत.

❝ "पिंपळे सौदागरमधील नागरिकांसाठी हे योगा पार्क केवळ एक प्रकल्प नाही, तर त्यांच्या आरोग्यपूर्ण जीवनशैलीची गरज आहे. सर्व विभागांनी समन्वय ठेवून उर्वरित कामे तातडीने पूर्ण करावीत. कोणतीही शिथिलता न ठेवता दर्जेदार आणि सुरक्षित सुविधा निर्माण करून हे पार्क लवकरात लवकर नागरिकांच्या सेवेत आणणे, ही आमची ठाम भूमिका आहे."

**-शत्रुघ्न काटे, शहराध्यक्ष तथा नगरसेवक, भाजपा.**